पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उभारणार देशातील पहिले सायबर सुरक्षा केंद्र

**कोल्हापूर : विजय पाटील**

सायबर क्राईम आणि अफवा जगातील सर्वच देशांची डोकेदुखी बनली आहे. त्यामुळे सायबर सिक्युरिटीची गरज अपरिहार्य बनली आहे. या पार्श्वभूमीवर 'सेंटर ऑफ एक्सलन्सी सायबर सिक्युरिटी' या नावाचे देशातील पहिले केंद्र शिवाजी विद्यापीठात १ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे.

केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाने यासाठी सात कोटी रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे. या केंद्राकडून बनवण्यात येणारा अभ्यासक्रम देशातील सर्वच विषयांतील अभ्यासक्रमांमध्ये समाविष्ट असणार आहे.

- देशातील सर्व अभ्यासक्रमांत सायबर सिक्युरिटीचा समावेश
- सात कोटी रुपयांचे अनुदान
- शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक तुरा

आधुनिक जगाचे सूत्रसंचालन माहिती-तंत्रज्ञान करू लागले आहे. आता तर जगण्यातल्या प्रत्येक गोष्टीशी सोशल मीडियाचा कनेक्ट महत्त्वाचा बनला आहे. अशा माहिती आणि तंत्रज्ञानाने समृद्ध दुनियेला सायबर समस्यांनीही वेढले आहे. यावर ठोस उपाययोजना निर्माण करण्यासाठी याबाबतचे पहिले केंद्र शिवाजी विद्यापीठात साकारले जाणार आहे.

> सायबर सिक्युरिटीचे हे केंद्र म्हणजे शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सन्मान आहे. देशातील हे एकमेव केंद्र आहे.
>
> - डॉ. देवानंद शिंदे कुलगुरू

> विद्यापीठातील आजपर्यंतचा हा सर्वात मोठा रेकॉर्ड प्रोजेक्ट आहे. या प्रोजेक्टमुळे संगणकशास्त्र विभागाला खूप मोठी संधी मिळाली आहे.
>
> - डॉ. आर. के. कामत, संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख

**पुढारी विशेष**

### सायबर ग्लोबल अभ्यासक्रम

आगामी तीन वर्षांत ४५ अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देऊन एक्स्पर्ट तयार केले जातील. तसेच देशातील सर्वच अभ्यासक्रमांत यापुढे समावेश होणाऱ्या सायबर सिक्युरिटीचा विषयसुद्धा या केंद्रात तयार होईल. हा अभ्यासक्रम ग्लोबल असेल.

### असे असेल केंद्र

या केंद्राशी पोलिस दलही कनेक्ट असणार आहे. त्यामुळेच गोव्याचे डीआयजी मुकेश चंदर, डेटा कौन्सिल ऑफ इंडियाचे गोडसे, नॅसकॉमचे चेतन सामंत, युधिष्ठीर यादव, आयएएस अधिकारी मीता राजुलोचन हे मान्यवर सल्लागार असतील. केंद्राची सुसज्ज इमारत, अत्याधुनिक लॅब साकारली जाणार आहे.

लोकमत

# गुणवत्ता शिष्यवृत्तीत डीकेटीई प्रथम

## कुलगुरुंच्या हस्ते सत्कार : अभियांत्रिकी विद्या शाखेतील निमशहरी गट

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठाच्यावतीने शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभात डीकेटीईचे प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले व त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करताना कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे. यावेळी डी. आर. मोरे उपस्थित होते.

**इचलकरंजी** : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये डीकेटीईच्या टेक्स्टाईल अ‍ॅण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटने अभियांत्रिकी विद्या शाखेतील निमशहरी गटातून प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते डीकेटीई टेक्स्टाईल अ‍ॅण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटचा गुणवत्ता प्राप्त महाविद्यालय म्हणून सत्कार करण्यात आला. हा सत्कार संस्थेचे संचालक प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले, प्रा. डॉ. यू. जे. पाटील, प्रा. डॉ. एल. एस. आडमुठे यांनी स्वीकारला.

विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागात उच्च शिक्षण घेणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थी व विद्यार्थिनी या शिक्षणापासून वंचित राहू नयेत, म्हणून त्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीची निर्मिती केली आहे. कोल्हापूर येथे झालेल्या गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभ सन २०१७-१८ गटनिहाय गुणवत्ताप्राप्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला.

विद्यापीठ पातळीवर संस्थेने मिळविलेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, सचिव डॉ. सपना आवाडे यांनी डॉ. कडोले व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

पुढारी

# 'व्यक्तिमत्त्व विकासासाठी त्रिभाषा सूत्र हवे'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

व्यक्तिमत्त्व विकासामध्ये भाषा हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. प्रत्येकाने मराठी, हिंदी आणि इंग्रजी हे त्रिभाषा सूत्र आत्मसात करणे आवश्यक आहे, असे मत मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील तज्ज्ञांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागात एकदिवसीय व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत विविध विषयांतील तज्ज्ञ सहभागी झाले होते.

यावेळी मराठीचे निवृत्त प्राध्यापक डॉ. रवींद्र ठाकूर, प्राध्यापक डॉ. चंद्रकांत लंगरे, प्राध्यापक डॉ. अर्जुन चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. विभागप्रमुख डॉ. नीशा पवार यांनी स्वागत केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. शिवाजी जाधव यांनी करून दिला. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी उपस्थीत होते.




# तरुणांनो, बुद्धीच्या कक्षा वाढवा

## - डॉ. सुभाष देसाई

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

आजच्या तरुणांपुढे रोबोटिक आव्हाने उभी ठाकली आहेत. त्यामुळे तरुणांनी स्वतःला केवळ तंत्रज्ञानापुरते सीमित न करता आपल्या बुद्धीच्या कक्षा वाढविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुभाष देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे राज्यशास्त्र अधिविभागात आयोजित दत्ताबाळ स्मृती व्याख्यानमालेंतर्गत 'दत्ताबाळांचे जीवन व कार्य' या विषयावर डॉ. देसाई बोलत होते. अर्थशास्त्र विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये झालेल्या या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. सुभाष देसाई म्हणाले, जीवनात यशस्वी होण्यासाठी विचारांची पायाभरणी चांगली असली पाहिजे. तरुण पिढीने धर्म आणि विज्ञान याबाबत तौलनिक चर्चा केली पाहिजे. त्याचा त्यांना निश्चितच लाभ होईल. बॅ. बाळासाहेब खर्डेकर आणि प्राचार्य एम. आर. देसाई यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात जवळ-जवळ पाचशे प्राथमिक शाळा काढल्या. प्राचार्य एम. आर. देसाई यांचे दत्ताबाळ हे द्वितीय चिरंजीव होते. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव प्राचार्य देसाई यांच्यावर होता. तेच संस्कार दत्ताबाळांवर होते. सामाजिक चळवळींचा वसा त्यांनी त्यांच्यापासून घेतला. त्यानुसार वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमांत ते सहभागी होत. निसर्गात, माणसांत ईश्वर पाहण्यास शिका, ही दत्ताबाळांची शिकवण होती.

डॉ. प्रकाश पवार म्हणाले, भारतात दोनशे वर्षांपूर्वी १८१८ साली मध्यमवर्गीयांमध्ये आधुनिकता उदयास येण्यास सुरूवात होत होती. त्यावेळेस, मी कोण आहे, असा प्रश्न भारतीयांनी स्वतःला विचारण्यास सुरूवात केली. त्या पद्धतीने आपण कोणत्याही टोकाला, निष्कर्षाला न जाता नेमकेपणाने दत्ताबाळ यांच्याबद्दल विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, असे आवाहन त्यांनी केले.

# ‘एमबीए’तर्फे रक्तदान

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या एमबीए अधिविभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ५० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. एम.बी.ए अधिविभाग व छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयाच्या रक्तसंकलन पेढीमार्फत या शिबिराचे संयोजन करण्यात आले होते. प्रमिलाराजे रुग्णालयाच्या रक्तसंकलनाचे पेढी प्रमुख डॉ. केदार पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी सहकार्य केले. विभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार, डॉ. दीपा इंगवले, डॉ. गंधाली खारगे व भावकू पाटील यांचे प्रोत्साहन लाभले.

स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील बेटी बचाओ अभियानांतर्गत विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण कार्यशाळा झाली. कोणत्याही प्रसंगात मुलींना त्यांचे रक्षण स्वतः करता आले पाहिजे या हेतूने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली. समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेत ५०० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. संदीप पाटील यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे दिले. डॉ. आर. व्ही. गुरव, रेक्टर डॉ. प्रतिभा पवार यांनी नियोजन केले.

# २९ सप्टेंबरपासून जिल्हा युवा महोत्सव

म. टा. वृत्तसेवा, आजरा

शिवाजी विद्यापीठाच्या २०१८-१९चा ३८ व्या द्विस्तरीय युवा महोत्सव सप्टेंबरच्या अखेरीस होणार आहे. यावर्षीचा जिल्हास्तरीय युवा महोत्सव २९ सप्टेंबर आणि १ व ३ ऑक्टोबर रोजी अनुक्रमे कोल्हापूर, सातारा आणि सांगली जिल्ह्यात होणार आहे.

विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव ५ ते ७ ऑक्टोबर यांदरम्यान सांगलीच्या विलींग्डन कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाने संलग्नित कॉलेजांना याची माहिती दिली आहे. यावर्षी कोल्हापूर जिल्हा युवा महोत्सव महावीर कॉलेजमध्ये, साताऱ्यात कोरेगावचे डी. पी. भोसले कॉलेज तर सांगली जिल्ह्याचा महोत्सव आटपाडीत श्रीमंत बाबासाहेब देशमुख कॉलेजमध्ये होणार आहे. युवा महोत्सवामध्ये जिल्हा स्तरावर सांघिक व वैयक्तिक स्वरुपाच्या १३ कलाप्रकारांत स्पर्धा होईल. यामध्ये एकांकिका, लघुनाटिका, मुकनाट्य, पथनाट्य, लोकनृत्य किंवा लोककला, लोकसंगीत वाद्यवृंद, समूहगीत, वादविवाद व प्रश्नमंजुषा या सांघिक तर सुगमगायन आणि वक्तृत्व या वैयक्तिक स्पर्धा समाविष्ट आहेत. जिल्हा स्तरावर प्रथमच नकला स्पर्धा होतील.

विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धा प्रत्येक जिल्ह्याच्या यजमान महाविद्यालयांवर २२ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता होतील. जिल्हास्तरावरील पहिल्या ३ यशस्वी संघांच्या, तसेच याशिवाय १४ इतर कला प्रकारातील स्पर्धा थेट मध्यवर्ती महोत्सवामध्ये होतील. राष्ट्रीय कव्वाली, इंद्रधनुष्य आणि पश्चिम विभागीय युवा महोत्सवासाठी विद्यापीठीय संघ निवड ८ व ९ ऑक्टोबरला तर कव्वाली सराव शिबीर १० ते २१ ऑक्टोबर दरम्यान विद्यापीठात होईल. जिल्हा व मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी १५ सप्टेंबरपर्यंत प्रवेशिका पाठविणे आवश्यक आहे.

**५ ते ७ ऑक्टोबर दरम्यान रंगणार मध्यवर्ती महोत्सव**